महाराष्ट्र शासन

उद्योग संचालनालय

## जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर

स्टेशन रोड, अहमदनगर पिन ४१४००१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी: (0241) 2355342 E mall -didic.ahmednagar@maharashtra.gov.in


जिल्हा निर्यात प्रचलन समिती सभा दि.२५/१/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. राजेंद्रकुमार पाटील साहेब निवासी उपजिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या सन्माननीय अध्यक्षतेखाली सभा संपन्न झाली. सदर सभेचे इतिवृत्त.

मा.जिल्हाधिकारी साहेब तथा अध्यक्ष, जिल्हा निर्यात प्रचलन समिती अहमदनगर यांचे कार्यव्यस्ततेमुळे मा. राजेंद्रकुमार पाटील साहेब निवासी उपजिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे सन्माननीय अध्यक्षतेखाली सभा सुरु करण्यात आली.

श्री अतुल दवंगे महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर तथा सदस्य सचिव जिल्हा निर्यात प्रचनल समिती अहनदनगर यांनी मा.अध्यक्षांचे स्वागत करुन सभेच्या विषयानुसार कामकाजास सुरुवात केली.

| अ.क्र./ विषय क्र. | विषय | विषयांवरील चर्चा / निर्णय | कार्यवाही संबंधीत कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | निर्यात विषयक अहमदनगर जिल्हयाचा कृती आराखडा तयार करणे. व मंजूरीबाबत | श्री अतुल दवंगे महव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर यांनी अहमदनगर जिल्हयातील निर्यातक्षम उद्योगास असलेला वाव व सुविधा, निर्यातीची सद्यस्थिती याबाबत सविस्तर कृती आराखडा तयार केला असल्याबाबतची माहिती बैठकीत दिली.सदर कृती आराखडयास मा. अध्यक्षांनी समंती दिली. तसेच सदर कृती आराखडा प्रमाणे अंमलबजाणी करणेबाबत सुचित केले. | जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर |
| २. | एक जिल्हा एक उत्पादन बाबत चर्चा | एक जिल्हा एक उत्पादन बाबत याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली त्यानुसार जिल्हयात दुग्ध पदार्थ व साखर हे उत्पादन निश्चित करण्यात आले.<br>एक जिल्हा एक उत्पादन अंतर्गत ची सविस्तर माहिती जिल्हयातील अहमदनगर, शिर्डी , कोपरगांव या महत्वाच्या रेल्वेस्टेशनवर व शिर्डी विमानतळावर स्टॉल लावण्याबाबत शासनाच्या सूचना असल्याबाबतची माहिती महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर यांनी सभागृहास दिली<br>याबाबत मा जिल्हाधिकारी साहेब अहमदनगर यांच्या स्वाक्षरीने संबंधीत रेल्वेस्टेशन , एअरपोर्ट यांना कळविण्याबाबत मा अध्यक्षांनी सूचित केले | जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर |

| अ.क्र./ विषय क्र | विषय | विषयावरील चर्चा / निर्णय | कार्यवाही संबंधीत कार्यालय |
|---|---|---|---|
| ३. | जिल्हा निर्यात प्रचलन समिती मध्ये नविन सभासद आमंत्रित करण्याबाबत. | निर्यात करणारे उद्योगांचे प्रतिनिधी म्हणून श्रीयुत. कारभारी गिगारे व राजिव ~~गुरव~~ राजूर यांना निर्यात प्रचालन समितीचे समेत निमंत्रित करणेबाबत सभेत सुचना करण्यात आल्या.<br>यास मान्य अध्याक्षांनी मान्यता दिली | जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर |
| ४. | जिल्हा निर्यात हब बाबत | श्री विनायकराव भुसारे, इंडो इस्त्राईल इंडस्ट्रिज चेंबर यांनी दि ११/१०/२०२२ रोजी दिलेल्या पत्रानुसार जिल्हा ऍक्सपोर्ट हब तयार करणेबाबत मा जिल्हाधिकारी अमहदनगर यांना निवेदन दिलेले आहे.<br>याबाबत श्री विनायक भुसारे /जिल्हा उद्योग केंद्र यांची मा जिल्हाधिकारी समवेत बैठक बोलविण्याबाबत मा अध्यक्षांनी सूचित केले | जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर |
| ४. | एक जिल्हा एक उत्पादन नुसार नविन उत्पादन समाविष्ठ करणेबाबत. | एक जिल्हा एक उत्पादन अंतर्गत इंजिनिअरींग उत्पादन समाविष्ठ करणेबाबतची सुचना श्री कटारीया अध्यक्ष आमी यांनी केली. याबबत अध्यक्षांनी मान्यता दिली. | जिल्हा उद्द्योग केंद्र, अहमदनगर |
| ५. | इतर विषय | जिल्हा निर्यात प्रचलन समितीमध्ये मा. अध्यक्षांनी विदित केले की, जिल्हयाची जास्तीत जास्त निर्यात वाढावी तसेच निर्यातीबाबतचे नियम सुविधा याबाबतीच सर्व माहिती उद्योजकांना अवगत करणेकामी जिल्हा उद्योग केंद्र यांनी प्रयत्न करावे. | जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर |

मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर करण्यात आले.

(अतुल दवंगे)
महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर तथा
सदस्य सचिव जिल्हा निर्यात प्रचलन समिती अहमदनगर

(राजेंद्रकुमार पाटील)
निवासी उपजिल्हाधिकारी अहमदनगर